# लोहमार्ग नागपुर येथिल भाग ५ दाखल गुन्हयाची माहीती दिनांक १६.०९.२०२३

| अक्र | गु.र.नं | गुन्हा घड जागा | गु. घड. ता. वेळ | गु.दा. ता. वेळ | फिर्यादीचे नाव | आरोपी | चोरीस गेला माल | मिळाला माल. | हकीकत | तपासी अंमलद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | वर्धा<br>405/2023<br>कलम 379<br>IPC<br><br>गुन्हा प्रकार<br>मोबाईल<br>चोरी | ट्रेन न. 12626 केरला एक्स चे कोच नं. S/4 चे दरवाज्या जवळ उभे असतांना रे.स्टे. चंद्रपुर येथुन गाडी सुटताच . | 16/09/2023<br>चे<br>15/45 वा<br>दरम्याण. | 16/09/2023<br>चे<br>18/49 वा | प्रमोद सुखमत सोनानी<br>वय 29 वर्षे<br>धंदा नोकरी (ड्रॉयव्हर)<br>राह. RBI – 58/B रेल्वे कॉर्टर बल्लारशहा 442701<br>मो नं. 8446270268, 9545073143 | अज्ञात | **<u>एकुण 16 948/- रू</u>**<br>एक निळया रंगाचा रिअलमी कंपनीचा मोबाईल मॉडल नं. 7 Pro त्यात सिम नं. 9673391431 एअरटेअर,9307140995 जिओ चे सिम, त्याचा IMEI NO. 861504057534470, 861504057534462, कि. 16,948/- रु. चा माल | निरंक | नमुद ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे दि.16/09/2023 रोजी नमुद ट्रेन, कोच वरून त्यांचे आई सोबत रे.स्टे. चंद्रपुर ते बल्लारशहा असा प्रवास करीत असताना प्रवासा दरम्याण फिर्यादी हे नमुद ट्रेन चे S/4 चे दरवाजा जवळ फोन वर बोलत असतांना रे.स्टे. चंद्रपुर येथुन ट्रेन सुटताच फिर्यादीच्या हाताला एका प्रवाशाचा धक्का लागला असता वरील नमुद वर्णनाचा मोबाईल ट्रेन चे खाली पडला असता तेथील एक अनोळखी इसमाने मोबाईल पडल्याचे पाहुन मोबाईल उचलुन मुद्दाम लबाडीने पळून गेला तेव्हा ट्रेन स्लो असल्यामुळे फिर्यादीना उतरता आले नाही. अशा फिर्यादीच्या फिर्याद वरून अपराध कलम 379 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल.<br><br>**<u>टिप</u> -:** आज दिनाक 16/09/2023 रोजी वेळ 18/20 वा. WPC/1203 मिश्रा यांनी रे.पो.चौकी बल्लारशहा येथुन जा. क्र. 397/2023 दि. 16/09/2023 अन्वये पो.स्टे. वर्धा चे टॅब वर 18.20 वा गुन्ह्याचे कागदपत्र पाठविले वरुन रे.पो.स्टे. वर्धा येथे दि. 16/09/2023 चे 18/49 वा. गुरन 405/2023 कलम 379 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल.<br><br>**फिर्यादी**<br>**रे.पो.स्टे** \| **पो स्टे ला आल्याची तारीख** \| **वेळ**<br>रे.पो.चौकी बल्लारशहा \| 16.09.2023 \| 16.10<br><br>**<u>विलंबाचे कारण</u> :-** आज दिनाक 16/09/2023 रोजी वेळ 18/20 वा. WPC/1203 मिश्रा यांनी रे.पो.चौकी बल्लारशहा येथुन जा. क्र. 397/2023 दि. 16/09/2023 अन्वये पो.स्टे. वर्धा चे टॅब वर 18.20 वा गुन्ह्याचे कागदपत्र पाठविले वरुन रे.पो.स्टे. वर्धा येथे दि. 16/09/2023 चे 18/49 वा. गुरन 405/2023 कलम 379 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल. | पोहवा<br>70<br>गाढवे |

<table>
<tr><th>अक्र</th><th>गु.र.नं</th><th>गुन्हा घड जागा</th><th>गु. घड. ता. वेळ</th><th>गु.दा. ता. वेळ</th><th>फिर्यादीचे नाव</th><th>आरोपी</th><th>चोरीस गेला माल</th><th>मिळाला माल.</th><th>हकीकत</th><th>तपासी अंमलद</th></tr>
<tr><td>०२</td><td>नागपूर 1128/2023 कलम 379 IPC<br><br>गुन्हा प्रकार टु व्हिलर चोरी</td><td>रेल्वे स्टे नागपुर चे रेल्वे वाँशिग यॉर्ड, कॅन्टीग जवळ</td><td>14/09/2023 चे 17/30 वा.</td><td>16/09/2023 चे 17/15 वा.</td><td>राकेश ईद्रसेन द्विवेदी वय-27 वर्ष, धंदा-मजुरी रा. सेमनेरी हिल्स गिट्टीखदान नागपुर मो. न. 8087887074</td><td>अज्ञात</td><td><u>एकुण 43 674/- रू</u> एक टु-व्हीलर सिल्वर रंगाची अँक्टीवा गाडी नं. MH-31EH9575 इंजिन नं. JF50E80197319 चेचिसनं. ME4JF501DD8197968 असलेली किं. 43,674 /- रु. चा माल.</td><td>निरंक</td><td>अशा प्रकारे आहे की, फिर्यादी हे दि. 14/09/23 रोजी दुपारी 14:00 वा. रेल्वे.स्टे नागपुर चे रेल्वे वाँशिग यॉर्ड, कॅन्टीग जवळ आपली टु-व्हिलर गाडी पार्क करुन पानी बाँटल विकने चे कामाकरिता रेल्वे स्टेशन नागपुर च्या आत गेले आपला काम करुन फिर्यादी घरी जाणेसाठी गाडी जवळ 17/30 वा. आले असता तेथे गाडी नव्हती कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादी चे गैरहजेरीचा फायदा घेउन फिर्यादीची टु-व्हीलर सिल्वर रंगाची अँक्टीवा गाडी किं. 43,674 /-रु. ची गाडी चोरुन नेली फिर्यादी यांनी गाडी ईकडे तिकडे शोध घेतली असता मिळुन आली नाही फिर्यादीला वाटले की माझी गाडी माझा कोणीतरी मित्र घेउन गेला असेल परंतु दोन दिवसा नंतरही फिर्यादी यांना गाडी मिळाली नाही म्हणुन फिर्यादी आज दि. 16/09/23 चे 16/30 वा रेल्वे पोलीस स्टेशन नागपुर येथे हजर होऊन चोरीची तक्रार दिले कि ही गाडी फिर्यादीच्या मित्र चे आई नामे रजनी हजारे यांच्या नावावर असुन फिर्यादी यांनी त्याच्या कडुन विकत घेतली होती. अशा फिर्यादीच्या फिर्याद वरून अपराध कलम 379 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल.<br><br><u>टिप :-</u> फिर्यादी हे आज दि. 16/09/2023 चे 16/30 वा CCTV फुटेज पाहुन रे.पो.स्टे. नागपुर येथे येवून लेखी तक्रार दिले वरून दि. 16/09/2023 चे 17/15 वा. गुरन 1128/2023 कलम 379 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल.<br><br>फिर्यादी<br><table><tr><th>रे.पो.स्टे</th><th>पो स्टे ला आल्याची तारीख</th><th>वेळ</th></tr><tr><td>नागपुर</td><td>16.09.2023</td><td>16.30</td></tr></table><br><u>विलंबाचे कारण</u> :- फिर्यादी हे आज दि. 16/09/2023 चे 16/30 वा CCTVफुटेज पाहुन रे.पो.स्टे. नागपुर येथे येवून लेखी तक्रार दिले वरून दि. 16/09/2023 चे 17/15 वा. गुरन 1128/2023 कलम 379 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल.</td><td>NK 482 तुमडाम</td></tr>
</table>

| अक्र | गु.र.नं | गुन्हा घड जागा | गु. घड. ता. वेळ | गु.दा. ता. वेळ | फिर्यादीचे नाव | आरोपी | चोरीस गेला माल | मिळाला माल. | हकीकत | तपासी अंमलदार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३ | नागपूर 1129/2023 कलम 406, 420 IPC<br><br>गुन्हा प्रकार पैसाचा अपहार केला | रेल्वे स्टेशन नागपुर पुर्वगेट रिजर्वेशन हॉल. | 14.09.2023 चे 09:30 वा. ते 11:00 वा. दरम्यान. | 16.09.2023 चे 17:39 वा. | विजय अमरनाथ फुले वय. 54 वर्ष धंदा. चर्च मध्ये फादर रा. एम.एस- 5 एन.आय.टी कॉम्पलेक्स, कलमना मार्केट चे मागे, नागपूर मो.क्र. 9960015102<br><br>सहफिर्यादी<br>विनेष कुमार कालुराम कुमार वय. 24 वर्ष धंदा. विद्यार्थी रा. एन.वी.सी बॉयज हॉस्टेल, वेटनेरी चैक, सेमीनरी हिल्स, नागपूर मो.क्र. 8421500244 | करण सुरेश यादव , वय 26 वर्षे, रा, वार्ड नंबर 4, राजु नगर , राधाकृष्ण मंदिर जवळ, वानाडोंगरी, हिंगना रोड, नागपुर<br><br>**? ?? ता ? वेळ**<br><br>14/09/23 चे 21.27 वा. | **एकुण 8270/- रू** फिर्यादी यांचे रु 6300/- व सहफिर्यादी यांचे 1970 रु असा एकुण 8270 रु ची रेल टिकीट रद्द करुन पैसाचा अपहार केला. | निरंक | अशा प्रकारे आहे की, फिर्यादी हे रेल्वे पोलीस ठाणे नागपूर येथे येवुन समक्ष लेखी तक्रार देतो की, मी व माझा मुलगा अनुग्रह फुले असे दिनांक. 14.09.2023 रोजी रेल्वे स्टेषन नागपूर येथील पुर्व गेट रिझेंवेषन हॉलमध्ये आलो व रिझेंवेषन काउन्टर वरून दिनांक 09.11.2023 रोजीची नागपूर ते कल्याण विदर्भ एक्सप्रेस ची माझे मुलासह एकुण 15 लोकांची टिकीट बनवली. परत येण्याकरीता दिनांक. 14.11.2023 रोजीची गाडी क्रमांक 22848 मध्ये कल्याण ते नागपूर पर्यत परत येण्याची टिकीट बनवण्यासाठी रिझर्वेषन फॉर्म मध्ये नाव लिहत असताना एक अनोळखी इसम लाल काळया रंगाचा चेक शर्ट घातलेला दाढी वाढलेली वय. अदांजे 25 ते 30 वर्ष माझेजवळ आला व त्याने माझी टिकीट कन्फर्म काढुन देतो असे बोलला त्याने त्याचे मोबाईलवर दिनांक 14.11.2023 रोजीचे गाडी क्रमांक 22848 मध्ये वेटींग असल्याचे दाखवीले व त्याचे जवळील आय.आर.सी.टी.सी चे कन्फर्म टिकीटअँप दाखवीले म्हणुन मला त्याचेवर विष्वास बसला. त्यानंतर त्याने तो स्वतः रेल्वे टिकीट एजेन्ट असल्याचे सांगीतले व त्याने त्याचे नाव करण यादव असल्याचे सांगीतले त्यावरून मी त्यास गाडी क्रमांक 22848 मध्ये दिनांक 14.11.2023रोजीचे कल्याण ते नागपूर पर्यत एकुण 15 लोकांची नावे दिली त्याने त्या अँपद्वारे त्या अज्ञात संषयीत इसमाने आमची नमुद तारखेची कल्याण ते नागपूर स्लिपर क्लास ची टिकीट बनवुन त्याचे मोबाईमध्ये दाखवीले व त्याने आम्हास या टिकीटाचे एकुण 6300/- रू. त्याचे मोबाईल वर ऑनलाईन पाठविण्यास सांगीतले. त्यावरून मी त्यास माझे एस.बी.आय चे अकाउन्ट मधुन 1900/- रू. व बँक ऑफ ईडींया चे अकाउन्ट मधुन 4400/- रू. संषयीत इसमाचे मोबाईल क्रमांक 9981906809 यावर एकुण 6300/- रू. पाठवीले त्याचा काही वेळांनतर त्याने माझे व्हाँट्स अँपवर 03 तिकीट सकाळी 11:00 वा. पाठवली. आम्ही तिकीट कन्फर्म असल्याचे चेक करून परत घरी निघुन गेलो व दिनांक 16.09.2023 रोजी आम्ही अनोळखी संषयीत करण यादव ने पाठवलेली टिकीट तपासुन पाहता त्या टिकीटमध्ये गाडी क्रमांक 22848 ऐवजी गाडी क्रमांक 22865 या गाडीची दिनांक 14.12.2023 रोजीची टिकीट बनवुन दिल्याचे समजुन आले. त्याचवेळी माझे मुलाने पी.एन.आर क्रमांकवरून तिकीट चेक केली असता 03 तिकीट रद्द झाल्याचे पी.एन.आर क्रमांकावरून समजुन आले. त्यावरून आम्ही आज दुपारी संषयीत इसमाचा शोध घेण्याकरीता रेल्वे स्टेषन नागपूर येथे आलो परंतु तो मिळुन आला नाही. त्यावरून माझी फसवणुक झाल्याचे समजले. आज दिनांक 16.09.2023 रोजी चे 15.30 वा. त्या संषयीताचा शोध घेवुन रेल्वे पोलीस ठाणे नागपूर येथे आलो त्या संषयीत इसमाने माझी रेल्वे तीकीट काढुन देतो असे सांगुन मला दिनांक 14.11.2023 रोजीची स्वतःचे मोबाईल वर गाडी क्रमांक 22865 ची कन्फर्म टीकीट दाखवली त्यावरून मी त्याचेवर विष्वास करून त्याचे मोबाईल वर 13 लोकांची कल्याण ते नागपूर टीकीट बनवुन त्याचे मोबाईल वर 6300/- रू. ऑनलाईन ट्रान्सफर केले व त्यानी मला दिले तारखेची टीकीट न बनवुन देता एक महिना पुढेची व दुस-याच गाडीची टीकीट मला व्हाँट्स अँप द्वारे पाठवीली व काही वेळानंतर त्याने माझेद्वारे बनवलेली 13 लोकांची टीकीट कॅन्सल करून माझे 6300/- रू. अपहार करून फसवणुक केली आहे. मी रेल्वे पोलीस ठाणे नागपूर येथे माझे सोबत करण यादव याने फसवणुक केल्याचे लेखी तक्रार देत असतानाच आणखी एक प्रवासी नामे विनेष कुमार कालुराम कुमार यांची देखील करण यादव या संषयीताने 1970/- रू. रेल्वे तीकीट नागपूर ते मुंबई असे बनवुन पुन्हा ते परस्पर कॅन्सल करून त्यांचा रू. 1970/- एवढा रकमेचा अपहार करून फसवणुक केल्याने ते देखील तक्रार देण्याकरीता हजर आहेत. | API चौधरी |

तसेच विनेष कुमार कालुराम कुमार रेल्वे पोलीस ठाणे नागपूर येथे येवुन लेखी तक्रार देतो की, मी दिनांक 08.09.2023 रोजी रेल्वे स्टेषन नागपूर येथील रिर्झेवेषन हॉलमध्ये दिनांक 08.09.2023 रोजी दुपारी 01.00 वा. दरम्यान माझे वरीष्ठ वेटेनरी डॉक्टर सागर कोकाटे यांची नागपूर ते मुंबई दुरंतो गाडी क्रमांक 12290 एक्सप्रेस ची टीकीट काढणेकरीता रिझर्वेषन फॉर्म भरीत असताना माझे समोर एक इसम उभा होता. तो माझेवजळ आला त्याने आपले नाव करण यादव असे नाव सांगुन यादव ट्रॅव्हल्स मध्ये टिकीट बनवण्याचे काम करतो असे सांगुन नागपूर ते मुंबई ची टीकीट कन्फर्म करून देतो असे सांगीतले. त्यानी मला त्याचे मोबाईल वर RACची टीकीट Confirm Tkt या अँपद्वारे दाखवीले व मला पैसे पाठवण्यास सांगुन तीकीट काढुन देतो असे सांगीतले. मी त्याला त्याचे मोबाईल क्रमांक 9981906809 या वर 1970/- रू पाठवीले. त्यानंतर त्यानी माझेसमोर Confirm Tkt या अँपद्वारे ची टीकीट काढुन माझे व्हॉट्स वर दुपारी 01.16 वा. टीकीट पाठवली. त्यानंतर मी रेल्वे स्टेषन नागपूर येथे बाहेर पडताच मला माझे व्हॉट्स अप वर दुपारी 1.19 वा. तीकीट कॅन्सल झाल्याचे मॅसेज आले. मी लगेच रेल्वे स्टेषन नागपूर येथील रिझर्वेषन हॉल बुकींग काउन्टर वर येवुन त्या इसमास बघीतले असता तो इसम नामे करण यादव हा दिसला नाही. मी त्याचा आजुबाजुचे परीसरात शोध घेतला परंतु तो मिळुन आला नाही. आज दिनांक 16.09.2023 रोजी मला समजले की माझी करण यादव याने फसवणुक केली आहे. त्यावरून करण यादव याने माझे तिकीट बनुवन नंतर कॅन्सल करून त्यातुन मिळालेले पैसे स्वताजवळ ठेवुन माझे सोबत 1970/- रू .चा अपहार करून फसवणुक केली आहे.माझे पुर्वी श्री. विजय फुले यांची फसवणुक केलेबाबतची तक्रार त्यांनी रेल्वे पोलीस ठाणे नागपूर येथे दिली आहे. त्या संषयीत करण यादव इसमावर कायदेषीर कार्यवाही होणेस माझी लेखी तक्रार सादर आहे.अशा फिर्यादी व सहफिर्यादी यांच्या फिर्याद वरून अपराध कलम 406,420 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल .

टिप :- फिर्यादी व सहफिर्यादी हे आज दि. 16/09/23 चे 15.30 वा. रे.पो.स्टे. नागपुर येथे येवून लेखी तक्रार दिले वरून दि. 16/09/2023 चे 17/39 वा. गुरन 1129/2023 कलम 406, 420 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल.

फिर्यादी

| रे.पो.स्टे | पो स्टे ला आल्याची तारीख | वेळ |
|---|---|---|
| नागपुर | 16.09.2023 | 15.30 |

**<u>विलंबाचे कारण</u> :-**

| अक्र | गु.र.नं | गुन्हा घड जागा | गु. घड. ता. वेळ | गु.दा. ता. वेळ | फिर्यादीचे नाव | आरोपी | चोरीस गेला माल | मिळाला माल. | हकीकत | तपासी अंमलदार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०४ | नागपूर 1130/2023 कलम 406, 420 IPC<br><br>गुन्हा प्रकार पैसाचा अपहार केला | रे.स्टे नागपुर प्लॅटफार्म नंबर 07 वर इटारसी एंड ला पाण्याच्या टाकी खाली | 26.05.2023 चे 23:30 वा. दरम्यान. | 16.09.2023 चे 23:03 वा. | गौरव प्रकाश डाखोळे वय 27 वर्षे. धंदा - एम.एस. सपोर्ट सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमीटेड मध्ये मँनेजर पत्ता- त्रिमुर्ती नगर ,मोटघरे ले-आउट वर्धा पो.स्टे रामनगर मो.नं. 8308306218 | सचिन गहलोत, वय 42 वर्षे, रा. साईमंदिर रोड भामटीपुरा वर्धा ह.मु. हरिहर अपार्टमेंट लकडगंज नागपुर | <u>एकुण 18,00,000/- रू</u> एक बँग काळ्या रंगाची त्यात रोख 18 लाख (18,00,000/- रु) रुपये सोबत डेबीट कार्ड ई. | निरंक | अशा प्रकारे आहे की मी वर नमुद पत्त्यावर राहतो व एम.एस.सपोर्ट सव्हीसेस प्रायव्हेट लिमीटेड दिल्ली या कंपनीत डेपो मैनेजर या पदावर फरवरी 2022 पासुन काम करतो. एम.एस.सपोर्ट सव्हीसेस प्रायव्हेट लिमीटेड दिल्ली या कंपनीला फरवरी 2022 पासुन नागपुर व अजनी मध्ये कोच क्लिनींग, रनिंग ट्रेन ची साफसफाई करण्याचे काम आणि कोच अटेंडंट चे कराराचे काम मिळाले आहे. नागपुर आणि अजनी वरुन जाणारे 10 ट्रेन मध्ये साफसफाई करणे आणि एसी कोच मध्ये बेड रोल देण्याचे काम केले जाते. कंपनीमध्ये 350 कर्मचारी काम करतात. प्रत्येक कर्मचारी यांचे एचडीएफसी आणि युनीयन बॅंकेमध्ये अकांउट खाते उघडुन डेबीट कार्ड बनविलेले आहेत. परंतु त्यांचे सर्वाचे डेबीट कार्ड कंपनीचे वतीने माझेकडे असतात. कंपनी बॅक खात्यामध्ये पगाराचे पैसे टाकतात व आम्ही त्यांचे सर्वांच्या खात्यातुन डेबीट कार्डने पैसे एटीएम मशीन मध्ये जावुन पैसे काढतो आणि सर्व कर्मचारी यांना रोखीने पगार दिला जातो. आमचे कंपनीचे ऑफिस 7 नंबर प्लॅटफार्म वर इटारसी एंड ला पाण्याच्या टाकीखाली आहे. एम.एस.सपोर्ट सव्हीसेस प्रायव्हेट लिमीटेड दिल्ली ही कंपनी अनिल सोनी यांची आहे व जावेद पटेल हे भुसावलला राहत असुन ते अनिल सोनी यांचे सोबत पार्टनरशिपमध्ये काम करतात. सचिन गहलोत यांनी करारनाम्यावर जावेद पटेल यांचेकडुन काम घेतले होते. सुरवातीला सर्व डेबीट कार्ड हे सचिन गहलोत यांचे कडेच राहायचे, तेव्हा मी, नकुल ठवकर व श्यामसुंदर शर्मा असे एटीएम मधुन पैसे काढुन सचिन गहलोत यांचेकडे दयायचे व सचिन गहलोत हे सर्व कर्मचारी यांना रोखीने पगार देत होते. सचिन गहलोत, वय 42 वर्षे, रा. साईमंदिर रोड भामटीपुरा वर्धा ह.मु. हरिहर अपार्टमेंट लकडगंज नागपुर हे कंपनीचे जानेवरी 2023 पर्यत पाँवर ऑफ अटर्नी होते. तोपर्यत पगाराचे सर्व काम त्यांचे कडे होते. फेब्रुवारी 2023 पासुन पुरनदास काळेकर हे कंपनीचे पाँवर ऑफ अटर्नी आहेत. श्याम सुंदर शर्मा हे सुपरवायझर चे काम करतात तसेच नकुल ठवकर हा स्टोअर किपर चे काम करतो. जितेंद्र चंदेल हे कंपनीचे नविन मैनेजर म्हणुन रुजु झाले आहेत. सर्व कर्मचारी यांचे पगार हर महिन्याच्या 15 ते20 तारखेपर्यंत करायचे असतात. दिनांक 26.05.23 रोजी जितेंद्र चंदेल यांनी फोनद्वारे माहिती दिली की, बॅक खात्यामध्ये पगार आला असुन तुम्ही डेबीट कार्ड द्वारे एटीएम मशीन मधुन पैसे काढुन मला आणुन दयावे.मी, नकुल ठवकर व श्यामसुंदर शर्मा असे तिघेही काँटन मार्केट जवळील एचडीएफसी आणि युनीयन बॅंकेच्या एटीएम मशीनमधुन व इतर दोन एटीएम मशीन मधुन पैसे काढले. मी ते पैसे काळ्या रंगाच्या बॅग मध्ये टाकले व सर्व डेबीट कार्ड सुध्दा त्यातच टाकले. बॅगमध्ये एकुण 18 लाख रुपये होते. ती बॅग घेवुन मी व नकुल ठवकर असे ऑफिसला आलो व श्यामसुंदर शर्मा हे जितेंद्र चंदेल थांबले असलेल्या नफीज गेस्ट हाउस, मोमीनपुरा येथे गेले. ऑफिसला येणेपुर्वीच मला जितेंद्र चंदेल चा फोन आला की, पैसे केव्हा आणुन देतो तेव्हा मी 10 ते 11 वाजेपर्यत हाँटेलमध्ये पैसे आणुन देतो असे सांगितले. मी व नकुल ठवकर असे ऑफिसला एकुण 18 लाखाच्या बॅगसह ऑफिसला हजर असतांना रात्री 11.30 वाजताचे दरम्यान सचिन गहलोत हे ऑफिसमध्ये आला व मला म्हणाले की, बॅग मी घेवुन जात असुन उदयाला येवुन मी सर्व कर्मचारी | PI श्रीमती काशीद |

यांचे पगार करेल, मी त्यांना जितेंद्र चंदेल यांना पगाराचे पैसे दयायचे असुन उदया कर्मचारी याचे पगार करावयाचे आहे असे सांगितले असता ते ऐकत नसल्याने मी जितेंद्र चंदेल यांना फोनद्वारे सर्व हकिकत सांगुन त्यांचे सांगणे नुसार सचिन गहलोत यांना घेवुन मी व नकुल ठवकर असे सर्व हॉटेल नफिज गेस्ट हाउस मोमीनपुरा येथे गेलो. तेव्हा सचिन गहलोत यांनी जितेंद्र चंदेल यांना मी 18 लाख रुपयाची बॅग घेवुन जात असुन उदया कर्मचारी यांचा पगार करेल तसेच यापुर्वी सुध्दा मीच सर्व कर्मचारी यांचा पगार केलेला आहे असे सांगितले. परंतु सचिन गहलोत त्यानंतर कधीच आले नाही व त्यांनी कर्मचारी यांचा पगार सुध्दा केलेला नाही. सदर बाबत आम्ही रेल्वे पोलीस स्टेशन, नागपुर येथे अर्ज दिला होता सदर अर्जाची चैकशी रेल्वे पोलीस स्टेशन नागपुर व नंतर पोलीस स्टेशन धंतोली येथे होवुन चैकशी अंती रेल्वे पोलीस स्टेशन नागपुर पोलीसांनी बोलाविल्याने मी आज रोजी रेल्वे पोलीस स्टेशन, नागपुर येथे आलो आहे.तरी दिनांक 26.05.23 रोजी सचिन गहलोत यांनी विश्वास देवुन कंपनीच्या कर्मचारी यांचे पगाराचे एकुण 18 लाख रुपये सोबत डेबीट कार्ड सुध्दा घेवुन जावुन आतापर्यत पगार केलेला नसुन त्यांनी कंपनीची व कर्मचारी यांची पगाराची रक्कम त्यांचे ताब्यात विश्वासाने दिलेली असताना तिचा अपहार करुन फसवणुक केलेली आहे. म्हणुन मी कंपनीचे वतीने कायदेशीर कारवाई करीता रिपोर्ट देत आहे. हिच माझी रिपोर्ट असुन माझे सांगणेप्रमाणे लॅपटॉपवर मराठीत टाईप केली असुन प्रिंट काढल्यावर वाचुन पाहली असता बरोबर व खरी आहे. अशा फिर्यादी यांच्या फिर्याद वरून अपराध कलम 406,420 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल.

**टिप** :- फिर्यादी यांनी रे.पो.स्टे. नागपुर येथे दिनाकं 29.05.23 रोजी अर्ज दिला होता सदर अर्जाची चैकशी करुन टिपणी अहवाल मा. पोलीस अधिक्षक, लोहमार्ग नागपुर यांचे कार्यालयात सादर केला असता मा. पोलीस अधिक्षक साहेब यांनी सदरचा अर्जातील घटनास्थळ हे नागपुर चे हद्दीतील असल्याचे कळवुन सदरचा अर्ज पुढील कारवाई करीता नागपुर मा. पोलीस आयुक्तांकडे पाठविला होता सदर अर्जाची चैकशी पोलीस स्टेशन धंतोली यांनी करुन परत कारवाई करीता सदरचा अर्ज पोलीस अधिक्षक, लोहमार्ग नागपुर यांचे कार्यालयात पाठविल्याने मा. पोलीस अधिक्षक, लोहमार्ग नागपुर यांचे आदेश क्रमांक आर/23/तक्रार वर्ग/2023/4878 दिनाक 12.09.23 अन्वये रेल्वे पोलीस स्टेशन नागपुर येथे गुन्हा दाखल करण्याचे आदेश प्राप्त झाले. सदर प्रकरणामध्ये यातील फिर्यादी गौरव डाखोळे यांना फोनद्वारे बोलाविले असता त्यांची आईची प्रकृती अस्वस्थ असुन त्या वर्धा येथील हॉस्पीटल येथे अँडमिट असल्याने फिर्यादी हे आज दि. 16/09/23 चे 19.40 वा. रे.पो.स्टे. नागपुर येथे येवून लेखी तक्रार दिले वरून दि. 16/09/2023 चे 23/03 वा. गुरन 1130/2023 कलम 406, 420 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल.

फिर्यादी

| रे.पो.स्टे | पो स्टे ला आल्याची तारीख | वेळ |
|---|---|---|
| नागपुर | 16.09.2023 | 15.30 |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | **विलंबाचे कारण** :- फिर्यादी यांनी रे.पो.स्टे. नागपुर येथे दिनाकं 29.05.23 रोजी अर्ज दिला होता सदर अर्जाची चैकशी करुन टिपणी अहवाल मा. पोलीस अधिक्षक, लोहमार्ग नागपुर यांचे कार्यालयात सादर केला असता मा. पोलीस अधिक्षक साहेब यांनी सदरचा अर्जातील घटनास्थळ हे नागपुर चे हद्दीतील असल्याचे कळवुन सदरचा अर्ज पुढील कारवाई करीता नागपुर मा. पोलीस आयुक्तांकडे पाठविला होता सदर अर्जाची चैकशी पोलीस स्टेशन धंतोली यांनी करुन परत कारवाई करीता सदरचा अर्ज पोलीस अधिक्षक, लोहमार्ग नागपुर यांचे कार्यालयात पाठविल्याने मा. पोलीस अधिक्षक, लोहमार्ग नागपुर यांचे आदेश क्रमांक आर/23/तक्रार वर्ग/2023/4878 दिनाक 12.09.23 अन्वये रेल्वे पोलीस स्टेशन नागपुर येथे गुन्हा दाखल करण्याचे आदेश प्राप्त झाले. सदर प्रकरणामध्ये यातील फिर्यादी गौरव डाखोळे यांना फोनद्वारे बोलाविले असता त्यांची आईची प्रकृती अस्वस्थ असुन त्या वर्धा येथील हॉस्पीटल येथे अँडमिट असल्याने फिर्यादी हे आज दि. 16/09/23 चे 19.40 वा. रे.पो.स्टे. नागपुर येथे येवून लेखी तक्रार दिले वरून दि. 16/09/2023 चे 23/03 वा. गुरन 1130/2023 कलम 406, 420 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल. | |

| अक्र | गु.र.नं | गुन्हा घड जागा | गु. घड. ता. वेळ | गु.दा. ता. वेळ | फिर्यादीचे नाव | आरोपी | चोरीस गेला माल | मिळाला माल. | हकीकत | तपासी अंमलद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५ | अकोला<br>417/2023<br>कलम 379<br>IPC<br><br>गुन्हा प्रकार<br>पर्स<br>चोरी | रे.स्टे<br>वाशिम PF<br>No.01<br>वरून ट्रेन<br>नं. 17642<br>इंटरसिटी<br>एक्स चे<br>जनरल<br>डब्यात<br>चढत<br>असताना. | 16/09/2023<br>चे<br>10.40 वा.<br>दरम्यान | 16/09/2023<br>चे<br>19.33 वा. | माधुरी<br>सचिदानंद<br>कंधारकर<br>वय-30 वर्ष,<br>व्यव- ग्रुहिणी<br>रा. महाडा<br>काँलणी न्यु<br>कौठा नांदेड मो<br>नं-<br>9011948252 | अज्ञात | **एकुण 2,69,100/- रू**<br>एक छोटी ब्राउन रंगाची पर्स त्यात 1) दिड तोळे वजनाचे सोन्याती चैन 12 वर्षापुर्वी खरेदी केलेली कि. 45,000/-रु, 2) सोन्याचे मंगळसुत्र वजन दिड तोळे कि. 75,000/-, 3) दोन सोन्याच्या अंगठ्या वजन 2 तोळे कि. 60,000/-रु., 4) वेठ्याची सोन्याची अंगठी वजन 5 ग्रॅम कि. 30,000/-रु. 5) बाळाची सोन्याची अंगठी वजन 1 ग्रॅम कि. 6000/- रु., 6) रोख रक्कम 10,000(500X20) च्या नोटा, 7) चांदीची चैन वजन 3 तोळे कि. 2400/-रु., 8) पायातील चांदिचे जोडवे वजन 1 तोळे कि. 700/-रु., 9)राशिची खळयाची सोन्याची अंगठी वजन 3ग्रॅम 20,000/- रु., 10) बारिक खडे असलेली सोन्याची अंगठी वजन 3ग्रॅम 20,000/- रु, असा एकुण 2,69,100/- रु.चा माल. | निरंक | नमुद ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी ह्या त्यांचे मुलीसह दि.16/09/2023 रोजी रे.स्टे वाशिम ते नांदेड असा प्रवास करणे करीता रे.स्टे वाशिम प्लाटफार्म नं. 01 वरून ट्रेन नं. 17642इंटरसिटी एक्स चे जनरल डब्यात चढत असताना त्यांच्या खांद्यावरील लेडीज पर्स ची चैन उघडुन आतील छोटी पर्स त्यात असा एकुण 2,69,100/- रु.चा माल. कोणीतरी अज्ञात चोरट्याने प्रवासी लोकांचा गर्दीचा फायदा घेउन मुद्दाम लबाडीने चोरुन नेल्याचे फिर्यादी हे सदर ट्रेनचे कोच D/5 मध्य बसल्यानंतर त्यांना त्यांच्या खांद्यावरील पर्सची चैन उघडी दिसल्यावर लक्षात आले अशी फिर्यादी यांनी रे.पो.स्टे. नांदेड येथे दिले फिर्याद वरून शुन्य नंबरी गुन्हा दाखल करुन सदरचा गुन्हा ऑनलाईन CCTNS प्रणाली मध्ये ईकडील पो.स्टे.ला प्राप्त झाल्याने सबब अप कलम 379 भादवी प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला<br><br>टिप :- रे.पो.स्टे.नांदेड येथील दि.16/09/2023 चे 17.44वा. अप क्र.1010/2023 कलम 379 IPC प्रमाणे गुन्हा दाखल होवुन रेपोस्टे अकोला येथे दि. 16/09/2023 चे 18.45 वा ऑनलाईन CCTNS प्रणाली मध्ये गुन्हा वर्ग होवुन आल्याने रेपोस्टे अकोला येथे दि. 16/09/2023 चे 19.33 वा. गुरन 417/2023 कलम 379 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल.<br><br>**फिर्यादी**<br>रे.पो.स्टे \| पो स्टे ला आल्याची तारीख \| वेळ<br>नांदेड \| 16/09/2023 \|<br><br>**विलंबाचे कारण** :- रे.पो.स्टे.नांदेड येथील दि.16/09/2023 चे 17.44वा. अप क्र.1010/2023 कलम 379 IPC प्रमाणे गुन्हा दाखल होवुन रेपोस्टे अकोला येथे दि. 16/09/2023 चे 18.45 वा ऑनलाईन CCTNS प्रणाली मध्ये गुन्हा वर्ग होवुन आल्याने रेपोस्टे अकोला येथे दि. 16/09/2023 चे 19.33 वा. गुरन 417/2023 कलम 379 भादवि प्रमाणे गुन्हा दाखल. | PSI<br>निकम |

## लोहमार्ग नागपुर येथिल भाग ६ दाखल गुन्हयाची माहीती दिनांक. १६.०९.२०२३

| अ. क्र | गु.र.नं | गुन्हा घड जागा | गु. घड. ता.वेळ | गु.दा. ता.वेळ | फिर्यादीचे नाव | मिळाला माल | आरोपी | हकीकत | तपासी अंमलदार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

## लोहमार्ग पोलीस नागपूर जिल्हयातील मर्ग बाबत माहीती दि. १६.०९.२०२३

| अ.क्र | रेपोस्टे | मर्ग क्र व कलम | मर्ग घड जागा | मर्ग घड. ता.वेळ | मर्ग दा. ता. वेळ | फिर्यादी/ खबर देणारा नाव | मृतकाचे नाव व पत्ता | हकीकत | तपासी अंमलदार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |

## लोहमार्ग पोलीस नागपूर जिल्हयातील अटक आरोपी बाबत माहीती दि. १६.०९.२०२३

| अ.क्र. | रे.पो.स्टेचे नाव | गु.रं.नं. व कलम | अटक दिनांक व वेळ | आरोपीचे नाव सोंडले | नमूद आरोपीतांचे ॲम्बीस प्रणाली मध्ये फिंगरप्रिंट घेण्यात आले किंवा कसे. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | बडनेरा | 259/2023 कलम 379 भादवी | दि. 15/09/2023चे 07/03 वा 16/09/2023 पावेतो MCR | करणकुमार तीलक महंतो वय 20 वर्ष, धंदा मजुरी, रा-बाबुपुर पो- स्टे- तीनपहाड, तह-राजमल,जी - साहेबगंज -रा- झारखंड | होय |
| ०२ | वर्धा | 363/2023 कलम 379 34 भादवी | १६/०९/२०२३ चे ००/४५ वा. | विक्रम सुयकांत सुकुनगे वय 29 वर्ष,रा. बापसेवाडी ता.मुखेड जि. नांदेड | होय |
| | | | १६/०९/२०२३ चे ००/४५ वा. | सतिश रामदास चाबुकस्वार वय 27 वर्ष रा.पिसगाव ता.जि. औरंगाबाद | होय |
| | | | १६/०९/२०२३ चे ००/४५ वा. | हारुन मोतीराम दरेकर वय 38 वर्ष,रा.अवधुतवाडी पंचवटी रोड,गजानन चौक नाशिक | होय |
| | | | १६/०९/२०२३ चे ००/४५ वा. | कैलास राजेराम येरणे वय 37 वर्ष,रा गल्ली नं.7 रांजनगांव बजाज नगर ता.वाळुज औरंगाबाद | होय |
| ०३ | नागपूर | 1129/2023 कलम 420, 406 भादवी | १६/०९/२०२३ चे २१/२७ वा. | करण सुरेश यादव , वय 26 वर्षे, रा, वार्ड नंबर 4, राजु नगर , राधाकृष्ण मंदिर जवळ , वानाडोंगरी, हिंगना रोड, नागपुर | होय |
| ०४ | अकोला | 391/2023 कलम 379 IPC | 16/09/2023 चे 23.06 वा. | तोहीद खान समीर खान वय 21वर्ष, रा. खैर मोहम्मद प्लॉट अकोला | होय |

## लोहमार्ग नागपूर जिल्हयातील मिसिंग बाबत माहीती दि. १६.०९.२०२३

| अ.क्र | पोस्टे व क्र. | मिसिंग जागा | मिसिंग ता.वेळ | मिसिंग दा. ता. | फिर्यादीचे नाव | मिंसीग व्यक्ती चे नाव व पत्ता | हकीकत | तपासी अंमलदार |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक | निरंक |